**<u>रे. मु. क्र. ४५२/२०२२</u>**
MHAH250015942022
वैभव खंडु <u>विरुध्द</u> सुमन दाते

**<u>रे. मु. क्र.४११/२०२३</u>**
MHAH250014572023
सुमन दाते <u>विरुध्द</u> वैभव खंडु

**<u>दोन्हीही दाव्यांतील निशाणी क्र.५ वरील एकत्रीत आदेश</u>**.

रे.मु.क्र.४५२/२०२२ मधील वादींनी मौजे खडकवाडी, ता. पारनेर येथील गट क्र.३५६ पैकी उत्तर बाजुची निम्म्या हिश्याची शेतजमीन मिळकत त्यांच्या मालकीची आहे असे कथन करुन प्रतिवादींनी त्यांच्या कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा करु नये म्हणुन त्यांचेविरुध्द तुर्तातुर्त मनाई हुकुम मिळण्याची मागणी केलेली आहे तर रे.मु.क्र.४११/२०२३ मधील वादीने सदर गट क्र.३५६ मधील मध्यभागाचे क्षेत्र त्यांनी खरेदी घेतल्याचे कथन करुन प्रतिवादींनी त्या क्षेत्रावरील त्यांच्या कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा करु नये म्हणुन त्यांचेविरुध्द तुर्तातुर्त मनाई हुकुम मिळण्याची मागणी केलेली आहे. दोन्हीही दाव्यामध्ये गट क्र.३५६ वरील वादी व प्रतिवादी यांच्या मालकी क्षेत्र व कब्जे वहिवाटीबाबत वाद उपस्थित असल्याचे दिसत असल्यामुळे व दोघांनी एकमेकांविरुध्द तुर्तातुर्त मनाई हुकुम करण्याची मागणी केली असल्यामुळे दोन्हीही अर्जांचा एकत्रीतपणे विचार करुन निकाली काढण्यात येत आहेत.

२. <u>रे.मु.क्र.४५२/२०२२ मधील वादीचे कथन संक्षीप्त स्वरुपात खालीलप्रमाणे</u>–

गट क्र.३५६ मधील उत्तर बाजुचे निम्म्या हिश्याचे क्षेत्र वादी वैभव व अजिंक्य यांची वडिलोपार्जित मिळकत आहे. तशी फेरफार क्र.१६७८ ने नोंद झालेली आहे. वादीचे वडिल खंडु व आजोबा मारुती यांनी त्यांची वडिलोपार्जित मिळकत वाटप करुन मिळणेकरिता दावा क्र.२९५/१९९६ हा वाद मिळकतीच्या वाटपाकरिता दाखल

केला होता. त्यामध्ये तडजोड होवुन तडजोडीनुसार गट क्र.३५६ मधील उत्तरेच्या बाजुचे क्षेत्र वादींना देण्यात आले होते व तशी नोंद हुकुमनाम्यात झालेली होती. त्याप्रमाणे रे.द.क्र.१/२००२ दाखल होवुन गट क्र.३५६ मधील उत्तरेकडील क्षेत्र वादींचे पुर्वहक्कदार यांना मिळालेले होते व तशी नोंद फेरफार क्र.५२० ने झालेली होती. असे असताना प्रतिवादींनी एक विचाराने दि.२०.०६.२०२२ रोजी वादींना त्यांच्या मिळकतीमध्ये वहिवाट करण्यापासुन हरकत अडथळा केला व वादींना गट क्र.३५६ मधील उत्तरेकडील क्षेत्र वाटपात आलेले नाही व ते त्यांच्या ताब्यात नाही असे म्हणुन हरकत अडथळा केला. गट क्र.३५६ मधील उत्तरेकडील क्षेत्राचे वादी मालक असून त्यांची वहिवाट असल्यामुळे प्रतिवादींनी त्यांच्या मिळकतीवर हरकत अडथळा करु नये अशी त्यांनी मागणी केलेली आहे.

३. याउलट, प्रतिवादी क्र.१, सुमन यांनी निशाणी क्र.२० वर म्हणणे दाखल करुन वादींचे कथन नाकारलेले आहे. त्यांनी असे कथन केले आहे की, गट क्र.३५६ पैकी १हे ५४आर पोट खराबा ९आर हे क्षेत्र त्यांनी दि.२३.११.२०१९ रोजी शांताबाई बारवे, सोनाबाई वाडेकर व अनुसया ढोकळे यांचेकडुन नोंदणीकृत खरेदीखताने विकत घेतले आहे व ते क्षेत्र त्यांच्या ताब्यात आहे. त्यांनी पुढे असे कथन केले आहे की, वादींनी रे.मु.क्र.२९५/१९९६ या दाव्यातील चुकीच्या सुलेनामा आधारे चुकीचा नकाशा तयार करुन प्रस्तुतचा दावा दाखल केलेला आहे व त्या आधारे वादीच त्यांच्या वहिवाटीस हरकत अडथळा करत आहेत. सबब, प्रतिवादीने वादींचा मनाई हुकुमाचा अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

४. तसेच प्रतिवादी क्र.८ व ९ यांनी निशाणी क्र.२४ वर त्यांचे म्हणणे दाखल करुन ते रे.मु.क्र.८२७/२०१२ मधील हुकुमनाम्याप्रमाणे त्यांच्या हिश्यास आलेल्या जमीनी कसत असून वादी रे.मु.क्र.२९५/१९९६ च्या वाटपाप्रमाणे त्यांच्या क्षेत्रात वहिवाट करत असल्यामुळे वादी व प्रतिवादींचा एकमेकांच्या हिश्यास आलेल्या क्षेत्राशी

काहीही संबंध नसल्याचे कथन करुन ते वादींच्या कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा करत नसल्याचे म्हटलेले आहे व त्यांचा अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

५. रे.मु.क्र.४११/२०२३ मधील वादीचे कथन संक्षीप्त स्वरुपात खालीलप्रमाणे–

गट क्र.३५६ पैकी १हे ५४आर, पोट खराबा ९आर ही मिळकत वादी सुमन यांनी दि.२३.११.२०१९ रोजी शांताबाई लहानु बारवे, सोनाबाई साहेबराव वाडेकर व अनुसया लक्ष्मण ढोकळे यांचेकडुन नोंदणीकृत खरेदीखताने विकत घेतलेली आहे व त्याचदिवशी खरेदीखतानुसार वादीस त्या क्षेत्राचा ताबा मिळालेला आहे. वादीने सदर क्षेत्र खरेदी घेत असताना खरेदी घेणार यांचेकडुन कोर्ट वाटप मोजणी रजिस्टर क्र.९७/२०१८ चा दि.०७.०८.२०१८ रोजीचा नकाशा पाहिला होता व त्यामध्ये शांताबाई बारवे व इतर यांचे हिश्यास गट क्र.३५६ मधील टाकळी ढोकेश्वर मांडवे रस्त्यालगत मध्यभागचे क्षेत्र आले होते व ते क्षेत्र त्यांचे पुर्वहक्कदार यांचेमध्ये झालेल्या वाटपानुसार आलेले असल्यामुळे मोजणी नकाशाआधारे वादीने लिहून देणार यांचेकडुन ते क्षेत्र खरेदी घेतले आहे व ते त्यांच्या कब्जेवहिवाटीत आहे. परंतु प्रतिवादींनी रे.मु.क्र..२९५/१९९६ मध्ये जी तडजोड केली त्याबाबत दरखास्त क्र.१/२००२ दाखल करुन चुकीचा व बनावट नकाशा तयार केला व चुकीचा मोजणी अहवाल तयार करुन घेतलेला आहे. प्रतिवादींचा वादीने खरेदी घेतलेल्या क्षेत्राशी कोणताही संबंध नसताना ते वादीच्या कब्जेवहिवाटीस विनाकारण हरकत अडथळा करत आहेत. दि.२७.०५.२०२३ रोजीवादी त्यांचे कामगारांच्या मदतीने त्यांनी खरेदी घेतलेल्या क्षेत्रामध्ये नांगरीणीसाठी ट्रॅक्टर घेवुन गेले असता प्रतिवादींनी त्यांना हरकत घेतली. प्रतिवादींनी वादीस असाच हरकत अडथळा चालु राहिला तर वादीला खरेदी घेतलेल्या मिळकतीमध्ये उत्पन्न घेणे अश्यक्य होणार आहे. सबब, वादी सुमन यांनी प्रतिवादींविरुध्द तुर्तातुर्त मनाई हुकुम मिळण्याची विनंती केली आहे.

६. याउलट, प्रतिवादींनी निशाणी क्र.१५ वर म्हणणे दाखल करुन वादींचे कथन नाकारलेले आहे. त्यांनी असे कथन केले आहे की, प्रतिवादीने गट क्र.३५६ बद्दल रे.मु.क्र.४५२/२०२२ हा मनाई हुकुमाचा दावा दाखल केल्यामुळे त्याला शह देण्याकरिता वादीने प्रस्तुतचा दावा दाखल केलेला आहे. खरेदी देणार शांताबाई बर्वे व सोनाबाई वाडेकर व अनुसया ढोकळे यांचेकडुन गट क्र.३५६ मधील क्षेत्र खरेदी करताना खरेदी देणार यांचेकडे ताबा नसल्यामुळे त्यांनी वादीला त्या क्षेत्राचा ताबा देण्याचा संबंध येत नाही. गट क्र.३५६ मधील पहिली मोजणी व दुसरी मोजणी ही कोर्ट वाटपाच्या आधारे झालेली आहे व दुसरी मोजणी करतेवेळेस मोजणी अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयाचे रेकॉर्ड तपासले नसल्यामुळे वादीला उपयुक्त ठरेल असा मोजणी नकाशा तयार केलेला दिसतो व त्या नकाशाच्या आधारे वादीने दावा दाखल केल्यामुळे तो रद्द होण्यास पात्र आहे. प्रतिवादींनी पुढे असे कथन केले आहे की, रे.मु.क्र.२९५/१९९६ च्या समजुतीप्रमाणे मिळकतींचे वाटप झाले होते व त्या आधारे दरखास्त क्र.१/२००२ ची दाखल झाली होती व मोजणीदाराने सन २००६ साली वाटप करुन उत्तर बाजुचे निम्मे क्षेत्र प्रतिवादींना दिले होते व गट क्र.३५६ मध्ये पुर्व पश्चिम बांधाच्या उत्तरेकडील वाटणी प्रतिवादींना मिळाली होती. तेव्हापासुन प्रतिवादी त्या क्षेत्रात वहिवाट करत आहेत. वादीचे खरेदीखत सन २०१९ साली झालेले असून वादीचा प्रतिवादींच्या क्षेत्राशी कोणताही संबंध नसल्यामुळे वादीचा मनाई हुकुमाचा अर्ज नामंजुर करण्याची विनंती प्रतिवादींनी केलेली आहे.

७. रे.मु.क्र.४५२/२०२२ मधील वादी व प्रतिवादींच्या कथनांचा विचार करता माझेसमोर खालीलप्रमाणे मुद्दे उपस्थित झाले असून त्याचे निष्कर्ष मी कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादी मागणीप्रमाणे प्रकरण त्याच्या बाजुने असल्याचे | होकारार्थी |

| | | |
|---|---|---|
| | प्रथमदर्शनी सिध्द करतो का ? | |
| २. | न्यायाचा समतोल वादीच्या बाजुने असल्याचे वादी सिध्द करतो का ? | होकारार्थी |
| ३. | मागणीप्रमाणे मनाई हुकुम मंजुर न केल्यास वादीचे कधीही भरुन न येणारे नुकसान होईल हे वादी सिध्द करतो का ? | होकारार्थी |
| ४. | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

८. रे.मु.क्र.४११/२०२३ मधील वादी व प्रतिवादींच्या कथनांचा विचार करता माझेसमोर खालीलप्रमाणे मुद्दे उपस्थित झाले असून त्याचे निष्कर्ष मी कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादी मागणीप्रमाणे प्रकरण त्याच्या बाजुने असल्याचे प्रथमदर्शनी सिध्द करतो का ? | नकारार्थी |
| २. | न्यायाचा समतोल वादीच्या बाजुने असल्याचे वादी सिध्द करतो का ? | नकारार्थी |
| ३. | मागणीप्रमाणे मनाई हुकुम मंजुर न केल्यास वादीचे कधीही भरुन न येणारे नुकसान होईल हे वादी सिध्द करतो का ? | नकारार्थी |
| ४. | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

९. वादी व प्रतिवादी यांचेतर्फे विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेख पडताळला.

१०. रे.मु.क्र.४५२/२०२२ व रे.मु.क्र..४११/२०२३ यामधील प्रस्तुतचे दोन्हीही अर्ज एकत्रीतपणे विचारात घेवुन त्याबाबतचे निष्कर्ष नोंदविण्यात येत

असल्यामुळे रे.मु.क्र.४५२/२०२२ मधील वादींना **वैभव व अजिंक्य** आणि प्रतिवादी क्र.१ यांना **सुमन** तर रे.मु.क्र.४११/२०२३ मधील वादीस **सुमन** आणि प्रतिवादींना **वैभव व अजिंक्य** असे सोयीकरिता संबोधिले आहे.

## कारणमिमांसा

**दोन्हीही प्रकरणातील मुद्दे क्र.१ ते ३ करिताः-**

११. रे.मु.क्र.४५२/२०२२ मधील वादींच्या (वैभव व अजिंक्य) कथनावरुन, गट क्र.३५६ मधील क्षेत्र त्यांना त्यांचे वडिल व आजोबा यांचेकडुन आलेले असुन तशी फेरफार क्र.१६७८ ने नोंद झालेली आहे. त्यांचे वडिल खंडु मारुती ढोकळे व आजोबा मारुती विठोबा ढोकळे यांनी वडिलोपार्जित मिळकतींचे वाटप करण्यासाठी त्यांचे सहहिस्सेदार लक्ष्मण विठोबा ढोकळे व इतर यांचेविरुध्द रे.मु.क्र.२९५/१९९६ चा दाखल केला होता व त्यामध्ये दि.२८.०८.२००१ रोजी तडजोड होवुन हुकुमनामा झालेला होता. त्या तडजोडीनुसार रे.द.क्र.१/२००२ प्रमाणे कोर्ट वाटप होवुन त्यांच्या पुर्व हक्कदारांना गट क्र.३५६ मधील उत्तर बाजुचे निम्म्या हिश्याचे क्षेत्र वाटणीला आले होते व तेव्हापासुन ते क्षेत्र त्यांच्या ताब्यात आहे.

१२. वैभव व अजिंक्य यांनी रे.मु.क्र.४५२/२०२२ मधील त्यांच्या कथनाच्या पुष्टयर्थ रे.मु.क्र.२९५/१९९६ मधील निशाणी क्र.१, तडजोड, हुकुमनामा तसेच रे.द.क्र.१/२००२ मधील निशाणी क्र.१ व त्यासोबत जोडलेला नकाशा, तसेच फेरफार क्र.५२० इत्यादी कागदपत्र दाखल केलेली आहेत. यावरुन असे दिसून येते की, वादींचे वडिल व आजोबा यांनी रे.मु.क्र.२९५/१९९६ दाखल करुन गट क्र.३५६ व इतर वडिलोपार्जित मिळकतींचे वाटप मागितले होते. दाव्यातील निशाणी क्र.४१ वर दाखल केलेल्या तडजोड पत्रावरुन असे दिसून येते की, त्या दाव्यातील प्रतिवादी क्र.१ ते ३, म्हणजेच लक्ष्मण विठोबा ढोकळे, अनुसया लक्ष्मण ढोकळे व बबन भाऊराव मिंडे हे समन्सची बजावणी होवुन देखील हजर झाले नव्हते. त्या दाव्यातील हुकुमनाम्यावरुन

असे दिसून येते की, त्या दाव्यातील वादी व प्रतिवादी क्र.४ यांचेमध्ये तडजोड झाल्याने तसा हुकुमनामा झालेला होता. हुकुमनाम्याप्रमाणे त्या दाव्यातील वादींचा वाद मिळकतींमध्ये निम्मा हिस्सा असल्याचे घोषित करण्यात आले होते व तडजोड पत्रानुसार वाटप करण्याचे निर्देश देण्यात आले होते. त्या अनुषंगाने रे.द.क्र.१/२००२ दाखल झाल्याचे व त्यामध्ये गट क्र.३५६ मधील उत्तरेकडील क्षेत्र वादींचे वडिल व आजोबा म्हणजेच अनुक्रमे खंडु व मारुती यांना वाटपात दिल्याचे दिसून येते. तसेच फेरफार क्र.५२० चे अवलोकन करता दि.०७.०१.२००५ रोजी रे.मु.क्र..२९५/१९९६ च्या हुकुमनाम्यानुसार झालेल्या वाटपाची नोंद महसुल दप्तरी नोंदविल्याचे दिसून येते.

१३. याउलट, प्रतिवादी सुमन यांनी असे कथन केलेले आहे की, गट क्र.३५६ पैकी क्षेत्र १हे ५४आर खराबा ९आर चे क्षेत्र त्यांनी दि.२३.११.२००९ रोजी शांताबाई बर्वे सोनाबाई वाडेकर व अनुसया ढोकळे यांचेकडुन नोंदणीकृत खरेदीखताने घेतलेले आहे. त्यांनी खरेदीखत लिहून घेत असताना खरेदी देणार यांचेकडुन कोर्ट वाटप मोजणी क्र.९७/२०१८ दि.०७.०८.२०१८ रोजीचा नकाशा पाहिला होता व त्या नकाशाप्रमाणे लिहून देणार यांचे हिश्यास गट क्र.३५६ मधील टाकळी ढोकेश्ववर मांडवे रस्त्यालगत मध्यभागचे जे क्षेत्र आले होते ते त्यांनी मोजणी नकाशाआधारे खरेदी केले आहे. त्यामुळे वैभव व अजिंक्य यांचा त्यांनी खरेदी घेतलेल्या गट क्र.३५६ च्या मध्यभागी असलेल्या १हे ५४आर खराबा ९आर या क्षेत्राशी संबंध नाही. सदर कथनाच्या पुष्टयर्थ प्रतिवादी सुमन यांनी रे.मु.क्र.४११/२०२३ या सलग्न दाव्यामध्ये कोर्ट वाटप मोजणी क्र.९७/२०१८ चा नकाशा दाखल व त्यांचे दि.२३.११.२०१९ रोजीचे खरेदीखत दाखल केलेले आहे.

१४. रे.मु.क्र.४५२/२०२२ मधील वादी व प्रतिवादींच्या कथनांचा विचार करता गट क्र.३५६ या गटातील क्षेत्राच्या अनुषंगाने दोन वेळेस म्हणजेच रे.मु.क्र.२९५/१९९६, रे.द.क्र.१/२००२ अन्वये दि.२५.०९.२००६ रोजी व

रे.मु.क्र.८२७/२०१२, रे.द.क्र.८२०/२०१७ अन्वये कोर्ट वाटप मोजणी क्र.९७/२०१८ ही दि.०७.०८.२०१८ रोजी दुसरी मोजणी झाल्याचे दिसून येते. वादींचे कथन व रे.मु.क्र.२९५/१९९६ मधील हुकुमनामा तसेच दि.२५.०८.२००६ रोजीच्या रे.द.क्र.१/२००२ नुसार केलेल्या नकाशाचे अवलोकन करता गट क्र.३५६ मधील उत्तरेकडील निम्म्या हिश्याचे क्षेत्र वादींच्या पुर्वहक्कदार यांना वाटपामध्ये मिळाल्याचे दिसून येते. तर लक्ष्मण ढोकळे यांच्या वारसांदरम्यान रे.मु.क्र.८२७/२०१२ या दाव्यामध्ये तडजोड होवुन लक्ष्मण यांच्या वारसांचा गट क्र.३५६ मधील ३हे ९आर खराबा १६आर क्षेत्रामध्ये प्रत्येकी १/६ हिस्सा असल्याचे घोषित केल्याचे दिसून येते. त्या हुकुमनाम्याच्या अंमलबजावणीबाबत दाखल झालेली रे.द.क्र.८२०/२०१७ अन्वये मोजणी रजिस्टर क्र.९७/२०१८ द्वारे गट क्र.३५६ मधील उत्तरेकडील क्षेत्र सोडुन दक्षिणेकडील क्षेत्रामध्ये लक्ष्मण यांची पत्नी, अनुसया, मुली शांताबाई, मिराबाई व सोनाबाई तसेच लक्ष्मण यांच्या दुस–या पत्नीपासुन झालेला मुलगा नवनाथ व मुलगी मंगल यांचा हिस्सा दाखविल्याचे दिसून येते. गट क्र.३५६ चे एकुण क्षेत्र ७हे ८आर खराबा ३८ आर असल्याचे दिसून येते. रे.मु.क्र.२९५/१९९६ च्या हुकुमनाम्यानुसार त्यापैकी निम्मे क्षेत्र म्हणजेच ३हे ५५आर खराबा १९आर वादींच्या पुर्व हक्कदारांना मिळाल्याचे व उर्वरित निम्म्या हिश्याचे लक्ष्मण यांनी विक्री केलेले ४० आर क्षेत्र वगळता लक्ष्मण यांच्या वारसांना ३हे ९आर खराबा १६आर क्षेत्र वाटपात आल्याचे दिसून येते.

१५. लक्ष्मण यांच्या वारसांपैकी पत्नी अनुसया व मुली शांताबाई बरवे व सोनाबाई वाडेकर यांनी गट क्र.३५६ मधील त्यांचा हिस्सा रे.मु.क्र.४५२/२०२२ मधील प्रतिवादी क्र.१ सुमन यांना खरेदी दिल्याचे दिसून येते. प्रतिवादींच्या विधिज्ञांनी असा युक्तीवाद केला की, प्रतिवादी, सुमन यांनी लक्ष्मण यांच्या वारसांपैकी पत्नी अनुसया ढोकळे व मुली शांताबाई बरवे व सोनाबाई वाडेकर यांचे हिश्यास मोजणी रजिस्टर क्र.९७/२०१८ नुसार गट क्र.३५६ मधील जे मध्यभागाचे क्षेत्र आले होते ते त्यांनी

खरेदीखताने विकत घेतले आहे व त्या क्षेत्राशी वादींचा कोणताही संबंध नाही. परंतु वादी त्यांच्या खरेदी क्षेत्रास हरकत अडथळा करत असल्याचे कथन करुन त्यांनी रे.मु.क्र.४११/२०२३ मध्ये त्यांच्याविरुध्द मनाई हुकुम मिळण्याची मागणी केलेली आहे. तर वादींच्या कथनानुसार प्रतिवादी हे त्यांना ''तुम्हाला उत्तरेकडील व मध्ये पुर्व–पश्चिम बांध असलेली मिळकत वाटपास आलेली नाही व ती त्यांच्या ताब्यात नाही असे म्हणुन हरकत अडथळा करत असल्याचे म्हटल्याचे दिसून येते.

१६. प्रतिवादी सुमन यांनी रे.मु.क्र.२९५/१९९६ मधील हुकुमनामा, त्यातील तडजोड, त्या आधारे दाखल झालेली दरखास्त क्र.१/२००२ व २००६ साली झालेला मोजणी नकाशा नाकारलेला असला तरी देखील प्रतिवादी क्र.१ ने ज्यांचेकडुन गट क्र.३५६ मधील क्षेत्र खरेदी केले त्यांनी रे.मु.क्र.२९५/११९६ मधील हुकुमनामा, त्यानुसार झालेली मोजणी आव्हानीत केल्याचे दिसून येत नाही. तसेच प्रतिवादी सुमन यांनी ज्यांचेकडुन गट क्र.३५६ मधील क्षेत्र खरेदी केले त्या लक्ष्मण ढोकळे यांचे वारसांनी वादींची गट क्र.३५६ मधील उत्तरेकडील वहिवाट व वाटप नाकारल्याचे दिसून येत नाही व त्यांनी रे.मु.क्र.८२७/२०१२ मधील हुकुमनाम्यानुसार रे.द. क्र.८२०/२०१७ नुसार जी मोजणी केली त्यामध्ये देखील उत्तरेकडील क्षेत्र वगळुन दक्षिणेकडील क्षेत्रामध्ये वाटप करुन घेतल्याचे दिसून येते. त्यामुळे गट क्र.३५६ मध्ये उत्तरेकडील निम्म्या हिश्याचे क्षेत्र वादींच्या पुर्वजांना व त्याद्वारे वादींना वाटपात आलेले असल्यामुळे रे.मु.क्र.२९५/१९९६ मधील हुकुमनामा व त्याद्वारे दाखल झालेली दरखास्त क्र.१/२००२ व सन २००६ साली तयार झालेला कोर्ट वाटप मोजणी नकाशा वादातीत करुन प्रतिवादी सुमन यांना वादींच्या वहिवाटीस हरकत अडथळा करता येणार नाही.

१७. प्रतिवादी सुमन यांनी संलग्न दावा क्र.४११/२०२३ मध्ये दाखल केलेला मोजणी रजिस्टर क्र.९७/२०१८ नुसार उत्तरेकडुन निम्म्या हिश्याच्या क्षेत्रानंतर पहिला हिस्सा रे.मु.क्र.८२७/२०१२ या दाव्यातील प्रतिवादी क्र.४ म्हणजेच अनुसया ढोकळे,

दुसरा हिस्सा प्रतिवादी क्र.३ म्हणजेच मिराबाई जाधव, तिसरा हिस्सा प्रतिवादी क्र.२ म्हणजेच सोनाबाई वाडेकर व चौथा हिस्सा प्रतिवादी क्र.१ शांताबाई बरवे व त्यानंतरचा हिस्सा प्रतिवादी क्र.१ व ४ म्हणजेच नवनाथ व मंगल यांना वाटपात आल्याचे दिसून येते. प्रतिवादी क्र.१ यांनी शांताबाई बरवे, सोनाबाई वाडेकर व अनुसया ढोकळे यांचा हिस्सा खरेदी केल्याचे दिसून येते. सदर खरेदी क्षेत्राचा वादींच्या उत्तरेकडील निम्म्या हिश्याच्या क्षेत्राशी संबंध नसल्याचे दिसून येते. प्रतिवादी क्र.८ व ९ यांनी देखील वादीच्या अर्जास विरोध केला असला तरी त्यांचे क्षेत्र गट क्र.३५६ मध्ये दक्षिणे बाजुला असून व वादींचे क्षेत्र गटाच्या उत्तरेला असल्यामुळे प्रतिवादी क्र.८ व ९ यांचा वादीच्या वहिवाटीस हरकत अडथळा करण्याचा प्रश्न उद्भवत नाही. सबब, रे.मु.क्र..४५२/२०२२ मधील वादींनी म्हणजेच वैभव व अजिंक्य यांनी गट क्र.३५६ मधील उत्तरेकडील निम्म्या हिश्याच्या क्षेत्रावरील त्यांची मालकी व वहिवाट रे.मु.क्र.२९५/१९९६ मधील हुकुमनामा व त्यानुसार सन २००६ साली झालेला कोर्ट वाटप नकाशा याच्या आधारे शाबीत केलेली असल्यामुळे त्यांनी त्यांच्या अर्जातील मागणीच्या पुष्टयर्थ प्रथमदर्शनी केस सिध्द केलेली आहे.

१८. प्रतिवादी सुमन यांनी दि.२३.११.२०१९ रोजी गट क्र.३५६ मधील लक्ष्मण ढोकळे यांच्या काही वारसांकडुन मध्यभागचे क्षेत्र खरेदी केल्याचे कथन केले आहे. सदर कथन मान्य केले तरी त्यांच्या कथनानुसार लक्ष्मण यांच्या वारसांना कोर्ट वाटप मोजणी क्र.९७/२०१८ नुसार वाटप झाल्याचे दिसून येत असल्यामुळे जे क्षेत्र लिहून घेणार यांचेकडुन खरेदी केले ते त्यांच्या ताब्यात होते व त्या क्षेत्राशी वादींचा संबंध हे दाखविण्याकरिता सद्य स्थितीत कोणताही प्रथमदर्शनी पुरावा नाही. मुळात प्रतिवादी सुमन यांनी उत्तरेकडील निम्म्या हिश्याचे क्षेत्र सोडुन लक्ष्मण यांच्या वारसांकडुन मध्यभागचे क्षेत्र खरेदी केलेले आहे हे दाखविण्याकरिता खरेदीखत व मोजणी नकाशा सोडुन कोणताही कागदोपत्री पुरावा नाही.

१९. प्रतिवादी सुमन या खंडु यांच्या वारसांचे उत्तर बाजुचे क्षेत्र वादातीत करत असल्यामुळे व त्यांचे उत्तरेकडील क्षेत्र सोडुन लक्ष्मण यांच्या वारसांकडुन त्यांनी त्यांच्या हिश्याचे क्षेत्र खरेदी केलेले आहे हे जोपर्यंत सिध्द होत नाही तोपावेतो त्यांना खंडुच्या वारसांची म्हणजेच वादींची गट क्र.३५६ मधील निम्म्या हिश्यामध्ये मालकी व वहिवाट नाही असे म्हणता येणार नाही. प्रतिवादी सुमन यांनी खरेदी क्षेत्र खरदीखत करतेवेळेस मोजणी करुन घेतले होते असे त्यांचे कथनावरुन दिसून येत नाही. मुळात रे.मु.क्र.२९५/१९९६ व रे.मु.क्र.८२७/२०१२ या दाव्यातील हुकुमनाम्यानुसार खंडु व लक्ष्मण यांचा हिस्सा, वाटणी व क्षेत्र निश्चित झालेले आहे. खंडुच्या वारसांकडे रे.मु.क्र.२९५/१९९६ च्या हुकुमनाम्याप्रमाणे गट क्र.३५६ मधील उत्तरेकडील निम्म्या हिश्याचे क्षेत्र वाटपात आल्याचे व ते त्यांच्या सन २००६ पासुन ताब्यात असल्याचे दिसनू येते. याउलट प्रतिवादी सुमन यांनी लक्ष्मण यांचे काही वारसांकडुन त्यांचा हिस्सा खरेदी केलेला असल्याचे दिसून येते परंतु खरेदी क्षेत्राची मोजणी केली होती व ते क्षेत्र वादींना वाटपात आलेल्या हिश्याचे नव्हते असे कथन नसल्यामुळे खरेदीखत करतेवेळेस त्याची मोजणी करुन घेणे उचित ठरले असते की ज्यामुळे खरेदी क्षेत्राबाबत वाद उपस्थित झाला नसता. त्यामुळे रे.मु.क्र.४५२/२०२२ मधील वादींच्या कथनानुसार, प्रतिवादी त्यांच्या उत्तरेकडील निम्म्या हिश्याच्या क्षेत्रामध्ये वहिवाट करण्यापासुन त्यांना हरकत अडथळा करत असतील तर अशा परिस्थिती त्याबाबत त्यांचेविरुध्द मनाई हुकुमाचे मागणीबाबत न्यायाचा समतोल वादींच्या बाजुने असल्याचे दिसते. प्रतिवादींनी वादींच्या गट क्र.३५६ पैकी उत्तरेकडील निम्म्या हिश्याच्या मालकी क्षेत्रावरील हरकत अडथळयाबाबत त्यांचेविरुध्द तुर्तातुर्त मनाई हुकुम आदेश न केल्यास निश्चितच वादींचे अपरिमित नुकसान होवु शकते. याउलट रे.मु.क्र..४११/२०२३ मधील वादी सुमन यांनी खरेदी घेतलेले क्षेत्र खंडु ढोकळे यांना रे.मु.क्र.२९५/१९९६ नुसार झालेल्या हुकुमनाम्याप्रमाणे व सन २००६ साली झालेल्या मोजणी वाटपात आलेल्या

क्षेत्राव्यतिरिक्त आहे हे सद्य परिस्थितीमध्ये दिसून येत नसल्यामुळे त्यांच्या कथनानुसार गट क्र.३५६ मधील उत्तर बाजुस सन २००६ पासुन असलेल्या खंडु ढोकळे यांच्या वहिवाटीस प्रतिबंध करता येणार नाही. सबब, रे.मु.क्र.४५२/२०२२ मधील वादींनी प्रथमदर्शनी केस व न्यायाचा समतोल त्यांचे बाजुने असल्याचे तसेच प्रतिवादींविरुध्द मनाई हुकुम न दिल्याने अपरीमित नुकसान होईल हे सिध्द केलेले असल्यामुळे मी त्यामधील मुद्दा क्र.१ ते ३ चा निष्कर्ष होकारार्थी नोंदवितो व रे.मु.क्र.४११/२०२३ मधील मुद्दा क्र.१ ते ३ चे निषषकर्ष नकारार्थी नोंदवुन त्याप्रमाणे मुद्दा क्र.४ चा निष्कर्षाकरिता मी खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

## आदेश

१. रे.मु.क्र.४५२/२०२२ मधील निशाणी क्र.५ चा अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. रे.मु.क्र.४११/२०२३ मधील निशाणी क्र.५ चा अर्ज नामंजुर करण्यात येतो.

३. रे.मु.क्र.४५२/२०२२ मधील प्रतिवादीं वा त्यांचेतर्फे इतर कोणीही गट क्र.३५६ मधील उत्तर बाजुच्या वादींच्या निम्म्या हिश्याच्या क्षेत्रावरील त्यांच्या कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा करु नये असा त्यांचेविरुध्द तुर्तातुर्त ताकीद मनाई हुकुम देण्यात येत आहे.

RAHUL KESHAV DESHPANDE
Digitally signed by RAHUL KESHAV DESHPANDE
Date: 2025.01.17 17:06:18 +0530

दिनांकः– १६.०१.२०२५ ( आर. के. देशपांडे )

पारनेर दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर,

पारनेर.